विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, ब्रोकोली, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर,
शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच
ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४५ वा | शुक्रवार, दि. ०८ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सत्ता, कंत्राटं आणि टक्केवारीचं दुष्टचक्र;
# महाराष्ट्राच्या राजकारणासमोर गंभीर प्रश्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** राज्यात विकासाच्या नावाखाली हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प जाहीर होतात, भूमिपूजनांचा धडाका उडतो, मोठमोठ्या जाहिराती झळकतात आणि सत्ताधारी स्वतःला 'विकासपुरुष' म्हणून मिरवतात. मात्र या चमकदार घोषणांमागे सुरू असलेले सत्ता, कंत्राटदार आणि टक्केवारीचे कथित दुष्टचक्र आता उघडपणे चर्चेत येऊ लागले आहे.

'सत्ता – हजारो कोटींचे प्रकल्प – कंत्राटदार गडगंज श्रीमंत – टक्केवारी – पुन्हा सत्ता' हे समीकरण राज्याच्या राजकारणात इतकं खोलवर रुजलं आहे की, सामान्य जनतेच्या कराच्या पैशातून नेमकं विकास होतोय की राजकीय अर्थकारण, असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत.

**प्रकल्पांचे भूमिपूजन मोठे; प्रत्यक्ष काम मात्र प्रश्नचिन्हात**

राज्यात मेट्रो, समृद्धी महामार्ग, उड्डाणपूल, स्मार्ट सिटी, नदीजोड प्रकल्प, जलयोजना, रस्ते विकास, शासकीय इमारती, सौरऊर्जा प्रकल्प अशा हजारो कोटींच्या योजनांची घोषणा सातत्याने केली जाते. मात्र अनेक प्रकल्पांमध्ये खर्च वाढ, मुदतवाढ, निकृष्ट दर्जाची कामे आणि भ्रष्टाचाराचे आरोप सातत्याने समोर येत आहेत.

अनेकदा एखाद्या प्रकल्पाचे उद्घाटन होताच काही महिन्यांत रस्ते उखडणे, पूल तडे जाणे, पाणी योजना बंद पडणे किंवा काम रखडणे अशा घटना घडतात. त्यामुळे 'विकास' हा खरोखर जनतेसाठी आहे की निवडणूक आणि आर्थिक फायद्यासाठी, असा सवाल उपस्थित होतो.



**कंत्राटदार-राजकारणी साटेलोटे?**

राज्यातील मोठ्या प्रकल्पांभोवती काही मोजक्या कंत्राटदारांचे वर्चस्व असल्याची चर्चा नेहमीच होत असते. सरकार बदलले तरी काही कंत्राटदार मात्र कायम सत्तेच्या जवळ दिसतात. हजारो कोटींची कंत्राटे, वाढीव खर्च मंजुरी, नियमांमध्ये बदल, तातडीच्या निविदा या माध्यमातून काही कंपन्या आणि कंत्राटदार प्रचंड श्रीमंत झाल्याचा आरोप विरोधक सातत्याने करीत आले आहेत. राजकीय तज्ज्ञांच्या मते, निवडणुका लढवण्यासाठी लागणारा प्रचंड पैसा आणि त्यासाठी उद्योगपती–कंत्राटदारांवर असलेले अवलंबित्व हे या दुष्टचक्राचे मुख्य कारण आहे. सत्ताधाऱ्यांना निधी मिळतो, बदल्यात मोठी कंत्राटे दिली जातात आणि त्यातून निर्माण होणारा पैसा पुन्हा निवडणुकांमध्ये वापरला जातो, अशी टीका होत आहे.

**'टक्केवारी' संस्कृतीवर संताप**

सरकारी कामांमध्ये 'टक्केवारी' हा शब्द आता सामान्य लोकांच्या चर्चेचाही भाग बनला आहे. एखाद्या प्रकल्पाच्या मंजुरीपासून ते बिल मंजूर होईपर्यंत विविध स्तरांवर कमिशन दिल्याशिवाय काम होत नाही, अशी भावना समाजात वाढत आहे. यामुळे प्रामाणिक अधिकारी आणि गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्या संस्थांना मागे पडावे लागते, तर राजकीय आशीर्वाद असलेल्यांचेच फावते, असा आरोप अनेक सामाजिक संघटना आणि कार्यकर्ते करीत आहेत.

**जनतेच्या पैशातून कोणाचा विकास?**

राज्य सरकार दरवर्षी लाखो कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडते. हा पैसा करदात्या जनतेच्या खिशातून येतो. मात्र विकास प्रकल्पांच्या नावाखाली जर भ्रष्टाचार, कमिशन आणि आर्थिक संगनमत वाढत असेल, तर त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसतो. एकीकडे महागाई, बेरोजगारी, शेतकरी संकट, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील समस्या कायम असताना दुसरीकडे काही उद्योगसमूह आणि कंत्राटदारांची संपत्ती झपाट्याने वाढताना दिसते. त्यामुळे 'राज्याचा विकास' आणि 'काहींचा आर्थिक विकास' यातील फरक आता अधिक स्पष्टपणे जाणवू लागला आहे.

**लोकशाहीसमोरील मोठं आव्हान**

राजकारणात पैसा वाढला की लोकशाही कमकुवत होते, असे मत अनेक तज्ज्ञ व्यक्त करतात. कारण निवडणुका अधिक खर्चिक झाल्या की सामान्य आणि प्रामाणिक व्यक्तींसाठी राजकारणात टिकणे कठीण होते. परिणामी सत्ता ही जनसेवेऐवजी आर्थिक गुंतवणुकीचा मार्ग बनण्याचा धोका वाढतो.

राज्यातील सध्याच्या राजकीय आणि आर्थिक घडामोडींवरून हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे की, विकासाच्या नावाखाली सुरू असलेले हे 'सत्ता–पैसा–सत्ता' चक्र कधी थांबणार? आणि जनतेच्या पैशाचा खरा हिशोब जनतेलाच कधी मिळणार?

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर पारदर्शक व्यवस्था, स्वतंत्र चौकशी, कठोर जबाबदारी आणि सार्वजनिक निधीच्या प्रामाणिक वापराची. अन्यथा विकासाच्या नावाखाली उभे राहणारे प्रकल्प हे लोकहिताचे नव्हे, तर सत्तेच्या बाजाराचे प्रतीक बनत राहतील.

## माजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक अटकेत, राज्यभर खळबळ

**बीड (वृत्त सेवा):-** जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि वाढीव मावेजा वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी मोठी कारवाई करत पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (रक्ळ) माजी जिल्हाधिकारी यांना अटक केली आहे. लातूर येथील निवासस्थानी दिवसभर चौकशी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या अटकेमुळे प्रशासकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून राज्यभर या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

एसआयटीकडून चौकशी पूर्ण झाल्यानंतर अविनाश पाठक यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांना पुढील सुनावणीसाठी बीड न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मावेजामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. जमिनींचे मूल्यांकन वाढवून दाखवणे, वाढीव मोबदल्यासाठी बनावट आदेश काढणे आणि




सरकारी प्रक्रियेत फेरफार करून कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला आहे.

तपासानुसार, जिल्हाधिकारी म्हणून बदली होण्यापूर्वीच्या तारखा वापरून अविनाश पाठक यांच्या नावाने बनावट आदेश तयार करण्यात आले. या आदेशांवर कथित बनावट स्वाक्षऱ्या करून १५४ प्रकरणांमध्ये तब्बल २४१ कोटी ६२ लाख रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आला. त्यापैकी सुमारे ७३ कोटी ४ लाख रुपये संबंधित खातेदारांना वितरितही करण्यात आल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणामुळे शासनाची ७३ कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घोटाळ्यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे आदेश काढताना आवश्यक असलेल्या शासकीय नोंदी आणि रजिस्टरच उपलब्ध नसल्याचे तपासात उघड झाले आहे. भूसंपादन समन्वय कार्यालयाकडे संबंधित आदेशांची अधिकृत नोंद नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

एसआयटीच्या प्राथमिक तपासात अनेक आदेश हे मागील तारखांनी जारी करण्यात आल्याचे दिसून आले. यासाठी कथित बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत अधिकारी, कर्मचारी आणि इतर संबंधितांनी संगनमत केल्याची शक्यता तपास यंत्रणा व्यक्त करत आहेत.

या प्रकरणी यापूर्वीच येथे १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये अविनाश पाठक यांच्या नावाचाही समावेश होता. आर्थिक गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे सोपवला होता.

तपासादरम्यान अनेक धक्कादायक कागदपत्रे, मंजुरी आदेश आणि आर्थिक व्यवहारांची माहिती समोर आल्याने तपास अधिक वेगाने पुढे सरकला. त्यानंतर अखेर माजी जिल्हाधिकाऱ्यांवर अटकेची कारवाई करण्यात आली.

अविनाश पाठक हे २०१३ बॅचचे आयएएस अधिकारी असून ते महाराष्ट्र केडरमध्ये कार्यरत होते. बीड जिल्ह्याशी त्यांचा दीर्घकाळ संबंध राहिला आहे. त्यांनी उपजिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, पुरवठा अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आणि जिल्हाधिकारी अशा विविध पदांवर काम केले आहे.

विशेष म्हणजे जवळपास १५ वर्षे ते बीड जिल्ह्यात विविध जबाबदाऱ्या सांभाळत होते. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकीय मंडळातही त्यांनी सदस्य म्हणून काम पाहिले होते. गेल्या वर्षी त्यांची बदली येथे करण्यात आली होती.

या प्रकरणामुळे राज्यातील भूसंपादन प्रक्रिया, प्रशासकीय पारदर्शकता आणि महसूल विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली सरकारी निधीचा अपहार झाला असेल, तर हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून शासन व्यवस्थेवरील विश्वासाला मोठा धक्का असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

दरम्यान, या घोटाळ्यात आणखी काही वरिष्ठ अधिकारी, दलाल आणि संबंधित कर्मचाऱ्यांची नावे समोर येण्याची शक्यता असून एसआयटीकडून आर्थिक व्यवहारांचा सखोल तपास सुरू आहे. आगामी काळात या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## 'लेडी सिंघम'चा धाडसी प्रयोग; अवघ्या ३ तासांत ४० तरुणांनी साधला संपर्क, महिलांच्या सुरक्षेचं भयावह वास्तव उघड

**हैद्राबाद (विशेष वृत्त सेवा):-** शहरात महिलांच्या सुरक्षेच्या दाव्यांना हादरा देणारी घटना समोर आली आहे. हैद्राबाद मधील मलकाजगिरीच्या पोलीस आयुक्त यांनी महिलांच्या सुरक्षेची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यासाठी केलेल्या एका धाडसी प्रयोगातून समाजातील विकृत मानसिकतेचं भीषण वास्तव उघड झालं. साध्या वेशात आणि कोणत्याही सुरक्षारक्षकांशिवाय मध्यरात्री बसस्थानकावर उभ्या राहिलेल्या आयुक्त सुमती यांना अवघ्या तीन तासांत तब्बल ४० पुरुषांनी गाठत त्रास देण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे 'महिला रात्री सुरक्षित आहेत' हा दावा किती पोकळ आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

नुकताच पदभार स्वीकारलेल्या पोलीस आयुक्त सुमती यांनी शहरातील महिलांच्या सुरक्षेची वस्तुस्थिती तपासण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी कोणताही पोलीस ताफा किंवा बंदोबस्त न ठेवता एका सामान्य महिलेसारखे रात्री १२.३० ते पहाटे ३.३० या वेळेत बसस्थानक परिसरात उभे राहण्याचा निर्णय घेतला.

या काळात तब्बल ४० पुरुषांनी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा किंवा छेडछाड करण्याचा प्रयत्न केल्याचे



समोर आले. काहींनी अश्लील इशारे केले, काहींनी जबरदस्तीने संवाद साधण्याचा प्रयत्न केला, तर काही जण महिलेला एकटी पाहून तिचा गैरफायदा घेण्याच्या हेतूने पुढे सरसावले.

धक्कादायक बाब म्हणजे या सर्वांमध्ये केवळ गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक नव्हते. त्यात सुशिक्षित तरुण, विद्यार्थी, खासगी कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी आणि उच्चभ्रू कुटुंबातील युवकांचाही समावेश होता. अनेक जण मद्यधुंद अवस्थेत होते, तर काहींवर अमली पदार्थांच्या सेवनाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**'समोर महिला नव्हे, मानसिकतेची परीक्षा होती'**

या संपूर्ण मोहिमेचा उद्देश केवळ आरोपी पकडणे नव्हता, तर महिलांकडे पाहण्याची समाजाची मानसिकता उघड करणे हा होता. एका वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यालाही जर सार्वजनिक ठिकाणी इतक्या सहजपणे त्रास दिला जात असेल, तर सामान्य महिलांची परिस्थिती किती भयावह असेल याची कल्पना यावरून येते.

विशेष म्हणजे, समोर उभी असलेली महिला ही शहराची पोलीस आयुक्त आहे, याची कल्पना त्या तरुणांना नव्हती. त्यामुळे त्यांचे खरे वर्तन कॅमेऱ्यात आणि पोलिसांच्या नजरेत कैद झाले.

**पोलिसांची वेगळी भूमिका; गुन्ह्याऐवजी समुपदेशन**

या प्रकरणात पोलिसांनी तातडीने गुन्हे दाखल करण्याऐवजी वेगळा मार्ग स्वीकारला. सर्व संबंधित तरुणांची ओळख पटवून त्यांना कुटुंबीयांसमोर हजर करण्यात आले. त्यानंतर सार्वजनिक ठिकाणी महिलांशी कसे वागावे, कायद्याचे परिणाम काय असतात आणि महिलांचा सन्मान का महत्त्वाचा आहे याबाबत त्यांचे समुपदेशन करण्यात आले.

पोलिसांनी त्यांना कठोर इशारा देत भविष्यात अशा प्रकारची कृती केल्यास थेट कायदेशीर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

**२५ वर्षांपूर्वीही केला होता असाच प्रयोग**

आयुक्त सुमती यांच्यासाठी हा प्रयोग नवीन नव्हता. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात, सुमारे २५ वर्षांपूर्वी त्यांनी काझीपेट रेल्वे स्थानक परिसरात अशाच प्रकारे अंडरकव्हर राहून महिलांच्या सुरक्षेचा अभ्यास केला होता. तेलंगणा केडरच्या या वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांनी राज्य गुप्तचर विभागातही महत्त्वाची भूमिका बजावली असून माओवाद्यांच्या आत्मसमर्पण मोहिमांमध्येही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

**सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव**

या धाडसी मोहिमेनंतर सोशल मीडियावर आयुक्त सुमती यांच्या कामाचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. 'अशा अधिकाऱ्यांमुळेच महिलांमध्ये विश्वास निर्माण होतो', 'कायद्याचा खरा धाक निर्माण करणारी अधिकारी', 'महिलांच्या सुरक्षेसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरलेली आयपीएस' अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

मलकाजगिरी परिसरातील महिलांनीही या उपक्रमाचे स्वागत केले असून, केवळ बैठका आणि घोषणांपेक्षा प्रत्यक्ष कृती महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त केले आहे.

**महिलांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्न**

ही घटना केवळ एका शहरापुरती मर्यादित नाही, तर संपूर्ण समाजाला आरसा दाखवणारी आहे. महिलांनी रात्री बाहेर पडणे अजूनही धोकादायक का वाटते? सार्वजनिक ठिकाणी पुरुषांची वागणूक इतकी बेजबाबदार का आहे? शिक्षण असूनही महिलांकडे वस्तूप्रमाणे पाहण्याची मानसिकता का बदलत नाही? असे अनेक प्रश्न या प्रयोगामुळे पुन्हा ऐरणीवर आले आहेत.

महिलांच्या सुरक्षेसाठी केवळ पोलिसांचा बंदोबस्त पुरेसा नाही; तर समाजाची मानसिकता बदलणे, मुलांमध्ये लहानपणापासून स्त्री सन्मानाची जाणीव निर्माण करणे आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक असल्याचे या घटनेने पुन्हा अधोरेखित केले आहे.

## १२ क्विंटल कांदा विकला; हाती शून्य, उलट खिशातून भरावा लागला एक रुपया!

**छत्रपती संभाजीनगर (कटूसत्य वृत्त) :-** 'शेती फायदेशीर करू', 'शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू' अशा घोषणा सत्ताधाऱ्यांकडून सातत्याने केल्या जातात. मात्र प्रत्यक्षात बळीराजाच्या नशिबी अपमान, तोटा आणि आत्मिक वेदनाच येत असल्याचे विदारक चित्र ढंइँल्ल कृषी उत्पन्न बाजार समितीत समोर आले आहे. १२ क्विंटल कांदा विक्रीसाठी आणलेल्या शेतकऱ्याच्या हाती एकही रुपया न लागता उलट स्वतःच्या खिशातून एक रुपया भरावा लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

पैठण तालुक्यातील Varudi येथील शेतकरी प्रकाश गलधर यांनी मोठ्या मेहनतीने पिकवलेला १२ क्विंटल कांदा विक्रीसाठी बाजार समितीत आणला होता. उत्पादन खर्च, वाहतूक, मजुरी आणि बाजार समितीच्या खर्चानंतर अंतिम हिशोब करताना त्यांच्या हाती एकही रुपया उरला नाही. उलट बाजार समितीचे शुल्क भागवण्यासाठी त्यांना स्वतःच्या खिशातून एक रुपया भरावा लागला. ही पावती आता राज्यातील ढासळलेल्या कृषी व्यवस्थेचे प्रतीक ठरत आहे.

**'रक्ताचं पाणी करून पिकवलेलं पीक कवडीमोल'**

कांदा उत्पादनासाठी शेतकऱ्यांना प्रचंड खर्च करावा लागतो. बी–बियाणे, खते, औषधे, ठिबक सिंचन, मजुरी आणि वाहतूक यासाठी एकरी तब्बल ७० ते ८० हजार रुपये खर्च होतो. शेतकरी कर्ज काढतो, दागिने गहाण ठेवतो, घरखर्च कमी करतो आणि वर्षभराच्या आशेवर पीक उभं करतो. पण बाजारात भाव कोसळल्यानंतर त्या कष्टाची अक्षरशः राख होत असल्याचे चित्र आहे.

प्रकाश गलधर यांच्या कुटुंबाची परिस्थितीही याला अपवाद नाही. त्यांच्या पत्नीने दिवस–रात्र मेहनत करून कांद्याची लागवड केली. उन्हात, थंडीत आणि पावसात राबून कुटुंबाने हे पीक उभं केलं. घरातील दोन मुलांच्या शिक्षणाची फी, कर्जाचे हप्ते आणि संसाराचा खर्च भागेल या आशेने हा कांदा बाजारात आणण्यात आला होता. मात्र अंतिम पावती हातात पडताच संपूर्ण कुटुंब हादरून गेले.

वरुडी गावात मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड केली जाते. गावातील सुमारे २०० ते ३०० शेतकरी कांदा उत्पादनावर



अवलंबून आहेत. दरवर्षी जवळपास ३० हजार क्विंटल कांद्याचे उत्पादन घेतले जाते. मात्र यंदा बाजारातील पडलेल्या दरामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

अनेक शेतकऱ्यांना वाहतूक खर्चही निघत नसल्याने कांदा बाजारात आणणे परवडेनासे झाले आहे. काही ठिकाणी शेतकरी कांदा रस्त्यावर फेकून देत आहेत, तर काही जण जनावरांना खाऊ घालण्याची वेळ आल्याचे सांगत आहेत. 'उत्पादन खर्च निघत नसेल तर शेती करायची तरी कशासाठी?' असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.

एकीकडे सरकार कृषी विकासाच्या मोठमोठ्या घोषणा करत असताना दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. कांद्याच्या निर्यातीवरील निर्बंध, बाजारातील दलालांची मनमानी आणि साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत असल्याचा आरोप शेतकरी संघटनांकडून केला जात आहे.

कृषी तज्ज्ञांच्या मते, उत्पादन खर्चाच्या तुलनेत बाजारभावात सातत्याने होत असलेली घसरण ही ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी गंभीर धोक्याची घंटा आहे. जर शेतकऱ्यांच्या मालाला किमान हमीभाव आणि बाजार संरक्षण मिळाले नाही, तर पुढील काळात अनेक शेतकरी शेतीपासून दूर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**'बळीराजाने जगायचं कसं?'**

१२ क्विंटल कांदा विकूनही हातात काहीच न उरणे आणि उलट खिशातून पैसे भरावे लागणे ही घटना केवळ आर्थिक नुकसान नाही, तर शेतकऱ्यांच्या स्वाभिमानावर झालेला घाव आहे. मातीत सोनं पिकवणाऱ्या बळीराजाच्या कष्टाची अशी क्रूर चेष्टा होत असेल, तर शेती टिकणार कशी आणि शेतकरी जगणार कसा, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग–माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी–नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी
ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

**वात्रटिका**

**गोष्ट त्याच्या लग्नाची**

सांगता येतच नाही कोणाला
कधीही काही घडत आहे...
विरोधी नेत्याचे सत्ताधारीशी
म्हणे आता नाते जडत आहे...
पन्नाशी पार युवा नेत्याच्या
लग्नाची ही गोष्ट आहे...
सोशल मिडीयावर बनावट
न सोसणारी ही पोस्ट आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# संपत्तीचा साठा मुठभरांकडे; मग 'विकसित भारत' कोणासाठी?

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असल्याचा दावा सातत्याने केला जातो. पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था, जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था, स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया अशा घोषणांनी देशाची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण या चमकदार आकड्यांच्या मागे दडलेलं एक भयावह वास्तव आता उघडपणे समोर येऊ लागलं आहे. देशाची प्रचंड संपत्ती वेगाने मोजक्या हातात केंद्रित होत आहे, तर बहुसंख्य जनता आर्थिक असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलली जात आहे.

भारतात १००० कोटींपेक्षा जास्त संपत्ती असलेली अवघी १६८८ कुटुंबं आहेत आणि त्यांच्या हातात तब्बल १६६ लाख कोटी रुपयांची संपत्ती असल्याचा अंदाज आहे. ही रक्कम भारताच्या जीडीपीच्या जवळपास अर्ध्या भागाएवढी आहे. म्हणजे देशातील १४६ कोटी लोकसंख्येपैकी अवघ्या काही हजार लोकांच्या हातात राष्ट्रीय संपत्तीचा प्रचंड हिस्सा केंद्रित झाला आहे. ही केवळ आर्थिक विषमता नाही; तर सामाजिक, राजकीय आणि लोकशाही व्यवस्थेलाच हादरा देणारी परिस्थिती आहे.

एका बाजूला देशातील पाच सर्वात श्रीमंत कुटुंबांची संपत्ती गेल्या सहा वर्षांत चौपट होते, तर दुसऱ्या बाजूला मध्यमवर्गीयांचे उत्पन्न महागाईच्या तुलनेत स्थिर किंवा प्रत्यक्षात घटलेले दिसते. पेट्रोल, गॅस, शिक्षण, आरोग्य, घरभाडे, वीज, विमा या जीवनावश्यक खर्चांनी सामान्य माणसाचं जगणं कठीण केलं आहे. रोजगारनिर्मिती मंदावलेली आहे, छोट्या उद्योगांवर संकट आहे आणि तळागाळातील ५० टक्के लोकांचा राष्ट्रीय संपत्तीतील हिस्सा कमी होत चालला आहे. मग प्रश्न असा उभा राहतो की, देशाच्या आर्थिक प्रगतीचा लाभ नेमका कोणाला मिळतो आहे?

अर्थव्यवस्थेतील विषमता ही केवळ बाजारव्यवस्थेचा नैसर्गिक परिणाम म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. कारण या विषमतेला सरकारी धोरणांची साथ मिळत असल्याचा आरोप आता अधिक तीव्र होत आहे. सार्वजनिक बँकांकडून लाखो कोटींची कर्जे 'राईट ऑफ' केली जातात, मोठ्या उद्योगसमूहांना हजारो कोटींचे 'हेअरकट' दिले जातात, करसवलती जाहीर होतात; पण शेतकरी, कामगार, लघुउद्योग, बेरोजगार तरुण यांच्यासाठी मात्र काटकसरीचे अर्थशास्त्र लागू केले जाते.

जगातील अनेक अर्थतज्ज्ञ आणि श्रीमंत व्यक्तींनी स्वतःहून अतिश्रीमंतांवर अतिरिक्त कर लावण्याची मागणी केली आहे. जगातील ४०० पेक्षा अधिक अब्जाधीशांनी सरकारांना आवाहन केले होते की, प्रचंड संपत्तीवर अधिक कर आकारला जावा, जेणेकरून सामाजिक विषमता कमी होईल. पण भारतात उलट चित्र दिसते. येथे संपत्ती कर, इन्हेरीटन्स टॅक्स किंवा सुपर रिच टॅक्सचा विचार जरी झाला तरी त्याला 'उद्योगविरोधी' ठरवले जाते. प्रत्यक्षात अतिरिक्त संपत्ती कर किंवा वारसा कर (Inheritance Tax) ही कोणतीही क्रांतिकारी कल्पना नाही. जगातील अनेक विकसित देशांमध्ये असे कर अस्तित्वात आहेत. त्यातून मिळणारा महसूल शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, रोजगार, सामाजिक सुरक्षा, पायाभूत सुविधा यासाठी वापरला जातो. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात तर अशा उपाययोजना अधिक आवश्यक ठरतात. कारण लोकशाही फक्त मतदानावर टिकत नाही; ती आर्थिक न्यायावरही टिकते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही आर्थिक केंद्रीकरणाच्या धोक्याबाबत स्पष्ट इशारा दिला होता. त्यांनी सांगितले होते की, देशाची आर्थिक ताकद जर मोजक्या हातात एकवटत असेल, तर ती लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांविरोधात जाणारी प्रक्रिया आहे आणि त्याकडे अत्यंत सावधपणे पाहिले पाहिजे. आजची परिस्थिती पाहता बाबासाहेबांचा हा इशारा अधिक गंभीर वाटतो.

कारण आर्थिक ताकद ही शेवटी राजकीय ताकदीत रूपांतरित होते. प्रचंड संपत्ती असलेले उद्योगसमूह माध्यमांवर प्रभाव टाकतात, निवडणुकांवर प्रभाव टाकतात, धोरणनिर्मितीवर प्रभाव टाकतात आणि अखेर लोकशाहीतील समतोल ढासळतो. मग सरकार जनतेसाठी चालते की काही उद्योगसमूहांसाठी, हा प्रश्न निर्माण होतो.

देशात संपत्ती निर्माण होणं चुकीचं नाही; पण ती संपत्ती निर्माण करण्याची संधी आणि तिचा लाभ सर्वांना समानपणे मिळणं आवश्यक आहे. अन्यथा 'विकसित भारत' ही संकल्पना फक्त काही हजार लोकांच्या आलिशान जीवनापुरती मर्यादित राहील आणि उर्वरित जनता महागाई, बेरोजगारी आणि असुरक्षिततेच्या विळख्यात अडकलेली राहील.

आज गरज आहे ती आर्थिक वाढीच्या आकड्यांपेक्षा आर्थिक न्यायाच्या चर्चेची. कारण संपत्ती जर सतत वरच्याच थरात साचत गेली, तर सामाजिक असंतोष वाढेल, लोकशाही कमकुवत होईल आणि विकासाचा दावा केवळ प्रचारापुरता उरेल.

# महाराणा प्रताप ना कभी हारे; ना अकबर कभी जीता!

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघषार्ला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले. चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वानाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली. अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दुःखी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला. त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुज्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही. हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीतीर्वंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मशागत शेतीची, विचारांची आणि मनाचीही...

उन्हाळ्यात सर्व शेतकरी बांधव आपापल्या शेतीची मशागत करतात. सर्व प्रथम शेतकरी शेत जमिनीची नांगरणी करतात,त्यानंतर मातीच्या पलटीसाठी कुळवणी करतात.शेतातील काडी,कसपट व धसकटे वेचून शेती स्वच्छ केले जाते.शेताच्या मातीतील दगडधोंडे वेचले जातात आणि ते बांधावर ठेवले जातात.अशा प्रकारे शेतीची मशागत करून मातीला चांगल्या प्रकारे रखरखीत उन्हात तापवले जाते.अशी ही तप्त जमीन मान्सूनचा पाऊस पडला की पेरण्या योग्य बनते. शेतकरी शेतीची जशी मशागत करतात तशी मशागत आपण सर्वांनी आपल्या मनाची व विचारांची करणे काळाची गरज बनली आहे.

आजकाल प्रत्येक व्यक्तीचे मन हे कुविचारांनी,वासनांनी व अस्वच्छ कृत्यांनी भरलेले आहे.माणसं माणूस असुनही राक्षसावानी जगत आहेत आणि रानटी जनावरांप्रमाणे वागत आहेत.साबणाने अंघोळ करून दररोज शरीराची स्वच्छता केली जाते पण मनाची स्वच्छता कोणी करत नाही.

सभ्यता, सुसंस्कार, सुवर्तन, सुवचन, चारित्र्य आणि मानवता हे शब्द प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातून लुप्त झाले आहेत. त्यामुळे माणसं कसेही वागत आहेत, कसेही जीवन जगत आहेत. पैसा व धनदौलत कमावण्यासाठी संस्कार व चारित्र्य गहाण ठेवले जात आहेत. काहीही करुन व कसेही करून जास्तीत जास्त पैसा व दौलत कमावण्यासाठी बहुतांश लोकांची जीवघेणी धावपळ सुरू आहे. म्हणून शेतीच्या व घराच्या वाटणीसाठी अनेक नात्यांमध्ये जोरदार भांडणे सुरू आहेत. भाऊ भावाला मारतोय, मुलगा वडिलांना मारतोय, मुलगा आईला भांडतोय, बहिण भावाला कोर्टात खेचतेय.म्हणजे केवळ चार पैशासाठी माणसं नात्याचे पवित्र बंधन विसरून गेले आहेत. एकमेकांविषयी मनात कलुषित भावना निर्माण झाली आहे. चंगळवादी जीवन जगण्याकडे कल वाढला आहे. काही वासनांध माणसं लहान लहान वयांच्या व निष्पाप मुलींना आपल्या वासनेचे शिकार बनवत आहेत.अशा वासनांध राक्षसांना वेळीच पायबंद घालण्यासाठी आपण सर्वांनी व शासकीय यंत्रणेने सजग झाले पाहिजे.

अशा वासनांध व कलुषित मनांच्या लोकांना हेरून त्यांच्या मनाची मशागत करणे अत्यावश्यक आहे.मनाची मशागत करायची म्हणजे चांगले विचार आत्मसात केले पाहिजेत. चांगले विचार आत्मसात करण्यासाठी चांगले संस्कार व सुसंगत लाभणे फार गरजेचे आहे. त्यासाठी मनाला स्वच्छ करून मनावर चांगल्या गोष्टी व चांगले विचार बिंबवले गेले पाहिजेत.जे लोक पुन्हा पुन्हा वाईट कृत्ये करतात त्यांना कायमचे तुरुंगात डांबले पाहिजे. त्यांना कोणत्याही कारणाने तुरूंगातून बाहेर नाही सोडले पाहिजे. आजकाल शाळकरी मुले मुली तसेच कॉलेजमधील तरूण तरूणी अगदी क्षुल्लक कारणांवरून व इगो दुखावला गेला म्हणून टोकाचा वाद विवाद करत आहेत. सुसंस्कृतपणा सोडून गुंडागर्दी करत आहेत.वयाचे भान व ठेवता वाईट कृत्ये करून आईवडिलांना संकटात लोटत आहेत,स्वतःच्या जीवनाचे वाटोळे करून घेत आहेत.अशा संततीकडे आई वडिलांनी वेळीच लक्ष द्यावे व मानसिक तज्ञाकडे नेऊन सल्लामसलत करून घ्यावी.मनाची मशागत करणे, चांगले विचार बिंबवणे हेच आजच्या काळाचा मूलमंत्र आहे. आजकाल जातीयता व धर्मांधता वाढली आहे.अगदी उच्च शिक्षित लोक सुद्धा जातीभेद करताना व दुसऱ्या धर्मांना नावे ठेवताना दिसत आहेत.

असे करणे म्हणजे माणुसकी पायदळी तुडवून माझीच जात श्रेष्ठ, माझाच धर्म चांगला अशी बजबजपुरी माजवली जात आहे.

खरे तर माणूस जातीने वा धर्माने श्रेष्ठ गणला जात नाही.कोणत्याही व्यक्तीचे कर्म, त्याचे वर्तन व त्याची सभ्यता त्याचे मूल्यमापन करते. म्हणून आपण सगळ्यांनी स्वतःला फक्त माणूस समजून व उमजून घ्यावे, आणि माणुसकी हाच माझा खरा धर्म आहे हे मनावर बिंबवावे.मनातील सगळे विकार,उच्चनिचतेची भावना,वासना यांचा नायनाट करण्यासाठी आपापल्या मनाची मशागत करून घ्यावी. तरच या जगात माणुसकीचा निभाव लागणार आहे.आपण सगळेजण स्वार्थासाठी स्वतःचा,स्वतःच्या जातीचा आणि धर्माचा उदोउदो करत राहिलो तर जगातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहणार नाही.शेतकरी प्रत्येक उन्हाळ्यात शेतीची मशागत करतात त्याचप्रमाणे आपण सगळ्यांनी आपल्या मनाची मशागत करून घेतली पाहिजे. मनात सुविचारांची पेरणी केलीच पाहिजे.चांगल्या लोकांची संगत धरूया, चांगले विचार आत्मसात करूया. श्यामची आई व रमाई यांसारखी पुस्तके वाचली पाहिजेत.त्यातील विचार व संस्कार आत्मसात केले पाहिजेत. संत, महात्मे,व महामानवांनी दाखवलेला आदर्श जीवनमार्ग आपण सर्वांनी अनुसरला पाहिजे. मनाची मशागत होणे आजच्या काळातील अत्यावश्यक बाब झाली आहे.

**- बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
मो.९७३०९३९७३२

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस दिन: डॉ. राजेंद्र बगाटे

मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दुःख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन'म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि निःस्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली'म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत'हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.

या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो'हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.

रेड क्रॉस चळवळीची सात मूलभूत तत्त्वे ही तिच्या कार्याची खरी ओळख आहेत. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही तत्त्वे केवळ शब्द नसून मानवतेच्या सेवेसाठी जगणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या कार्याचे अधिष्ठान आहेत. मानवता हे तत्त्व सर्वात महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत माणसाचे दुःख कमी करणे आणि त्याचे जीवन सुरक्षित ठेवणे हे रेड क्रॉसचे प्रमुख उद्दिष्ट आहे. निष्पक्षता म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा राजकीय विचार न पाहता सर्वांना समान मदत करणे. तटस्थतेमुळे रेड क्रॉस कोणत्याही राजकीय किंवा लष्करी संघर्षात पक्षपाती भूमिका घेत नाही. त्यामुळेच जगभरातील लोकांचा या संस्थेवर विश्वास टिकून आहे.

रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते.

आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वात मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान'हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण असताना रेड क्रॉसचे स्वयंसेवक धैर्याने काम करत होते. अनेकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवले. महामारीच्या काळात मानवतेचे खरे दर्शन घडवणाऱ्या संस्थांमध्ये रेड क्रॉसचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. भारतामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.

रेड क्रॉसच्या कार्यामध्ये युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महाविद्यालये आणि शाळांमध्ये युवक रेड क्रॉसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित केली जाते. युवकांनी समाजासाठी काम करावे, रक्तदान करावे, पर्यावरण संवर्धनात सहभागी व्हावे आणि संकटाच्या काळात लोकांना मदत करावी, हा संदेश युवक रेड क्रॉसद्वारे दिला जातो. आजच्या तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी ही चळवळ अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात.

मानवतेच्या सेवेसाठी आर्थिक संपत्तीपेक्षा संवेदनशील मनाची अधिक गरज असते. एखाद्या संकटग्रस्त व्यक्तीला आधार देणे, भुकेल्याला अन्न देणे, रक्तदान करणे किंवा आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात. रेड क्रॉस आपल्याला हेच शिकवते की, मानवतेपेक्षा मोठा धर्म कोणताही नाही.

आज जगभरात युद्ध, दहशतवाद, हवामान बदल आणि महामारी यांसारखी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. लाखो लोक विस्थापित होत आहेत, अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्थांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. मानवतेच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या या संस्था जगात आशेचा किरण निर्माण करतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने रेड क्रॉसने आपले कार्य अधिक प्रभावी केले आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी आधुनिक साधने, माहिती तंत्रज्ञान आणि संप्रेषण माध्यमांचा वापर करून मदतकार्य अधिक वेगाने केले जात आहे.

रेड क्रॉसचे स्वयंसेवक हे या चळवळीचे खरे शिल्पकार आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजासाठी काम करणारे हे स्वयंसेवक मानवतेची जिवंत उदाहरणे आहेत. अनेक वेळा स्वतःच्या कुटुंबाची चिंता बाजूला ठेवून ते संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जातात. त्यांच्या सेवेमुळेच लाखो लोकांना नवजीवन मिळते. त्यांच्या कार्यामुळे समाजामध्ये सहकार्य, बंधुभाव आणि एकतेची भावना निर्माण होते. जागतिक रेड क्रॉस दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. समाजात असलेल्या दुःख आणि वेदना कमी करण्यासाठी प्रत्येकाने काही ना काही योगदान दिले पाहिजे. रक्तदान, अवयवदान, स्वयंसेवा, पर्यावरण संवर्धन किंवा शिक्षणाच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करता येऊ शकते. माणसाने केवळ स्वतःपुरता विचार न करता समाजाच्या कल्याणासाठी पुढे आले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित आणि सुखी असेल, तरच खऱ्या अर्थाने मानवतेचा विजय होईल.

आज अनेक तरुण सामाजिक कार्याकडे वळताना दिसत आहेत, ही सकारात्मक बाब आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनजागृती, निधी संकलन आणि मदतकार्य अधिक प्रभावीपणे केले जात आहे. परंतु केवळ ऑनलाईन सहानुभूती पुरेशी नसून प्रत्यक्ष कृती अधिक महत्त्वाची आहे. रेड क्रॉसची शिकवण आपल्याला कृतीशील मानवता शिकवते. संकटाच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी देशसेवा आणि मानवसेवा आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक रेड क्रॉस दिन हा मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. हेन्री ड्युनाँ यांनी सुरू केलेली ही चळवळ आज जगभरातील लाखो लोकांसाठी आशेचा आधार बनली आहे. सेवा, सहानुभूती, बंधुभाव आणि निःस्वार्थ वृत्ती या मूल्यांवर उभी असलेली रेड क्रॉस चळवळ मानवतेचा खरा चेहरा जगासमोर मांडते. आजच्या काळात प्रत्येकाने या चळवळीपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात मानवतेची भावना जोपासली पाहिजे. कारण शेवटी माणसाला माणसाचीच गरज असते, आणि संकटाच्या काळात पुढे येणारा मदतीचा हातच खऱ्या अर्थाने मानवतेचा लाल ध्वज ठरतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# आरोपीला मोबाईल पुरवणे भोवले; कुडुर्वाडी पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक निलंबित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वादग्रस्त भोंदू बाबा मनोहर मामा भोसले आणि त्याचा साथीदार विशाल वाघमारे याला पोलीस कोठडीत असताना आपला मोबाईल फोन वापरण्यास दिल्याप्रकरणी कुडुर्वाडी पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक बाळासाहेब दाढे यांना पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार तातडीने निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे सोलापूर जिल्हा पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

### नेमके प्रकरण काय?

रिअल इस्टेट एजंटला व्यवसायात प्रगतीचे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी मनोहर भोसले आणि विशाल वाघमारे यांना कुडुर्वाडी पोलिसांनी पुणे येथील मांजरी भागातून अत्यंत गोपनीयरीत्या ताब्यात घेतले होते. तपासाचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पातळीवरून कमालीची गोपनीयता पाळण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या दोघांना कुडुर्वाडी पोलीस ठाण्यातील गोपनीय कक्षात ठेवण्यात आले होते.

आरोपींना गोपनीय कक्षात ठेवलेले असताना तिथे हजर असलेल्या पोलीस नाईक बाळासाहेब दाढे यांनी आरोपी विशाल वाघमारे याला मोबाईल देऊन त्याचे कोणाशी तरी संभाषण करून दिले. या कृत्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. तपासाच्या कडक सूचना असतानाही आरोपीला अशा प्रकारे मदत करणे आणि आदेशाचा अवमान करणे, हा ठपका ठेवत पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून दाढे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून त्यांची नेमणूक मुख्यालयात करण्यात आली आहे.

### भक्तांचा राबता अन पोलिसांचा अटकाव

आरोपी कोठडीत असताना त्यांच्या काही भक्तांनी त्यांना तंबाखू आणि मिनरल वॉटरच्या बाटल्या पुरवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी हा प्रयत्न वेळीच हाणून पाडला. दरम्यान, संबंधित आरोपी सध्या करमाळा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यात सात दिवसांच्या पोलीस कोठडीत आहे.या निलंबनाच्या कारवाईमुळे कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून, पोलीस प्रशासनाने यातून कडक शिस्तीचा इशारा दिला आहे.

सदरचे प्रकरणात पोलिस अधिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु असून याबाबत मला काही माहिती देता येणार नाही.एक पोलिस नाईक मुख्यालयी हजर राहण्याचे आदेश आले आहेत.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी सिंहगडचा संघ गोव्याकडे रवाना



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रीडा क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथील हँडबॉल संघाने राष्ट्रीय पातळीवर दमदार झेप घेतली असून गोवा राज्यातील मडगाव येथे होणाऱ्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी संघ रवाना झाला आहे.

या यशामुळे परिसरात अभिमानाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या राष्ट्रीय स्पर्धेत शाळेचे अंडर-12 मुली, अंडर-17 मुलांचे आणि मुलींचे असे एकूण तीन संघ सहभागी होणार आहेत. राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत या संघांनी राष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळवले आहे.

संघाच्या शुभेच्छा समारंभात सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तसेच सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव येथील कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या प्रेरणादायी मनोगतातून खेळाडूंना आत्मविश्वास, शिस्त आणि चिकाटी यांच्या जोरावर सर्वोत्तम कामगिरी करण्याचा सल्ला दिला.

'तुमच्यातील जिद्द आणि संघभावना तुम्हाला निश्चितच यशाच्या शिखरावर घेऊन जाईल. शाळेचे व राज्याचे नाव उंच करा,' असे उत्साहवर्धक उद्गार त्यांनी व्यक्त केले.

या स्पर्धेसाठी खेळाडूंनी गेल्या काही महिन्यांपासून कठोर सराव केला आहे. क्रीडा शिक्षक राजू ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने आपली क्षमता सिद्ध केली आहे.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख यांनीही संघाला शुभेच्छा दिल्या.

पालक व शिक्षकवर्गानेही खेळाडूंवर शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल विश्वास व्यक्त केला.

# शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय सोलापूर येथे 6510 रुग्णांना मिळाली नवसंजीवनी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे अंधजन मंडळाचे, शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर, प्रकल्प एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय , यांनी नेत्रसेवेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून रुग्णालयात आतापर्यंत 6510 यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यासह लातूर, धाराशिव आणि आसपासच्या ग्रामीण भागातील हजारो गरजू रुग्णांना या सेवांचा लाभ मिळत आहे.

लहान गावांमधून येणारे शेतकरी, कामगार, मजूर तसेच विविध आर्थिक परिस्थितीतील रुग्णांवर अत्याधुनिक सुविधांद्वारे डोळ्यांचे उपचार करण्यात आले आहेत. रुग्णालयामध्ये सर्व प्रकारच्या नेत्ररोगांवर उपचार उपलब्ध असून सर्वसामान्य नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात उत्कृष्ट सेवा दिली जाते.

रुग्णालयात आधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, उच्च दर्जाची नेत्र तपासणी सुविधा तसेच अनुभवी व उच्चशिक्षित डॉक्टरांची टीम कार्यरत आहे. रुग्णांच्या सोयीसाठी सर्वसमावेशक नेत्र तपासणी व गुणवत्तापूर्ण उपचार सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

यावेळी असोसिएट डायरेक्टर श्री. सुधीर सुधाळ यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, 'डोळ्यांच्या कोणत्याही समस्येकडे दुर्लक्ष करू नका.शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर येथे आधुनिक तंत्रज्ञानासह विश्वासार्ह व परवडणाऱ्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. अधिकाधिक नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा. मोतीबिंदू मुक्त गाव करण्यासाठी अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठी लागणारी संपूर्ण यंत्रणा उपलब्ध असून ग्रामपंचायत, विविध सामाजिक संस्था यांनी सहकार्य करावे.'

रुग्णालय समाजातील प्रत्येक घटकापर्यंत उत्तम नेत्रसेवा पोहोचवण्यासाठी कटिबद्ध असून भविष्यातही ग्रामीण भागातील गरजू रुग्णांसाठी सेवा कार्य अधिक व्यापक करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

# 'टेक-वारी 2.0' अंतर्गत 'जनरेटिव्ह एआय' विषयावर विशेष तांत्रिक सत्र संपन्न



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** चॅट जीपीटी, जेमिनी यांसारख्या एआय प्लॅटफॉर्मचा शासकीय पत्रव्यवहार, अहवाल तयार करणे, डेटा विश्लेषण आणि नागरिक सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी कसा उपयोग होत आहे, याची माहिती फ्रंटियर टेक्नॉलॉजी, नसकॉम चे संचालक एम. चोक्कालिंगम यांनी दिली.

सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने मंत्रालय येथे टेक-वारी 2.0 अंतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्सः हँड ऑन विथ जनरेटिव एआय या विषयावर विशेष तांत्रिक सत्राचे आयोजन मंत्रालयात करण्यात आले होते.

शासन व्यवस्था आणि सार्वजनिक प्रशासनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चे वाढते महत्त्व या सत्रात अधोरेखित करण्यात आले. प्रमुख वक्ते चोक्कालिंगम यांनी तमिळनाडू ई-गव्हर्नन्स एजन्सी आणि नॅसकॉम मधील आपल्या अनुभवांच्या आधारे शासनाच्या कामकाजात एआय तंत्रज्ञानामुळे कार्यक्षमता आणि सेवा वितरण कसे सुधारत आहे, याविषयी माहिती दिली.

सत्रादरम्यान सहभागी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि जनरेटिव्ह एआय यांच्या मूलभूत संकल्पना सोप्या आणि व्यावहारिक उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आल्या. यावेळी एआय आधारित रिपोर्टिंग सिस्टीम, शासकीय योजनांसाठी चॅटबॉट सेवा तसेच आरोग्य क्षेत्रातील एआय-आधारित उपक्रमांची उदाहरणेही मांडण्यात आली. विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि प्रशासनात अकच्या वापराबाबत त्यांनी उत्सुकता व्यक्त केली.

सत्राच्या समारोपात वक्त्यांनी एआय हे मानवाचे पर्याय नसून मानवी कार्यक्षमता आणि निर्णयप्रक्रिया अधिक सक्षम करणारे प्रभावी साधन असल्याचे सांगितले. भविष्योन्मुख प्रशासनासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# दुसरे महायुद्ध लाभार्थ्यांनी हयातीचे दाखले जमा करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे सोलापूर जिल्ह्यातील दुसरे महायुद्ध लाभार्थ्यांनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार माहे मे २०२६ अखेरपर्यंत आपले हयातीचे दाखले जमा करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने लाभार्थ्यांनी आपला हयातीचा दाखला तसेच आधार कार्ड, पॅन कार्ड, ओळखपत्र व बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाद्वारे दिनांक ३१ मे २०२६ पर्यंत जमा करावीत. ज्या लाभार्थ्यांचे हयातीचे दाखले ३१ मे २०२६ पर्यंत कार्यालयास प्राप्त होणार नाहीत, त्यांचे अनुदान माहे मे २०२६ पासून बंद करण्यात येणार असून, हयातीचे दाखले प्राप्त झाल्यानंतर फरकासह अनुदान अदा करण्यात येईल, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

तसेच ज्या लाभार्थ्यांचे निधन झाले आहे, अशा लाभार्थ्यांच्या अवलंबितांनी मृत्यूचा दाखला अर्जासह लवकरात लवकर कार्यालयात जमा करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# 'एआय उपयुक्त, पण मानवी भावना आणि सर्जनशीलतेला पर्याय नाही'



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही कला, चित्रपटसृष्टी तसेच सर्वच क्षेत्रासाठी उपयुक्त तांत्रिक साधन असले, तरी मानवी भावना, संवेदना आणि सर्जनशीलतेची जागा ती कधीच घेऊ शकत नाही, असा सूर मंत्रालयात आयोजित 'टेक वारी 2.0'कार्यक्रमातील 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स'या परिसंवादात उमटला. कला, चित्रपट आणि शिल्पकलेतील मान्यवरांनी एआयच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना तंत्रज्ञानाचा वापर सजगतेने आणि विचारपूर्वक करण्याची गरज अधोरेखित केली.

सामान्य प्रशासन विभागातर्फे मंत्रालयात त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित 'टेक वारी 2.0'अंतर्गत 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स'या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात काळा घोडा आर्ट्स फेस्टिव्हलच्या संस्थापक आणि कलाकार बृंदा मिलर, शिल्पकार अरझान खंबाटा, चित्रपट दिग्दर्शक रोहन सिप्पी आणि ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा उपस्थित होत्या.

काळा घोडा फेस्टिव्हलच्या आयोजक तथा संस्थापक बृंदा मेलर म्हणाल्या की, गेली 27 वर्ष काळा घोडा फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते आहे. या फेस्टीव्हलमध्ये सातत्यता असल्यामुळेच हा फेस्टिव्हल यशस्वी आहे. कोणत्याही खाजगी फेस्टिव्हलला जर शासनाचा पाठिंबा मिळाला तर ते काम चांगले यशस्वी होते हेच काळाघोडा फेस्टिव्हलचे यश आहे. सुरूवातीला या फेस्टिव्हलला मर्यादा होती. आता फेस्टिव्हल शासनाच्या मदतीमुळे चांगला होत आहे याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले.

ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी चित्रपट क्षेत्रातील आपल्या प्रदीर्घ प्रवासातील बदलत्या तंत्रज्ञानाचा अनुभव कथन केला. सुरुवातीच्या काळात चित्रपटांमध्ये ॲनिमेशनचा वापर का करत नाही, असा प्रश्न विचारला जात असे. त्यानंतर त्यांनी स्वतःचे प्रशिक्षण केंद्र सुरू करून नवोदित कलाकारांना संधी दिली. 'कलाकाराला शिखरापर्यंत पोहोचण्यापासून रोखणारे वारे, यशानंतर त्याच कलाकाराच्या पावलांवर डोकं टेकवतात,' असे सांगत त्यांनी कलाकारांच्या संघर्षाचे वास्तव मांडले. एआयवर आधारित चित्रपटांच्या वाढत्या वापराबाबत बोलताना कौल म्हणाले, 'चित्रपट हे केवळ तंत्रज्ञान नाही, तर मानवी भावनांचे माध्यम आहे. संवेदना आणि भावनिक स्पर्श नसलेला चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकत नाही. आज वेळ वाचवण्यासाठी अनेक शॉर्टकट वापरले जात आहेत; मात्र चित्रपट हा विविध कलांचा संगम असल्याने त्यामध्ये मानवी स्पंदन टिकणे अत्यावश्यक आहे.'

चित्रपट दिग्दर्शक रोहन सिप्पी यांनी एआयला चित्रपटसृष्टीसमोरील नवे आव्हान मानले. 'प्रत्येक काळात चित्रपट क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहिली आणि ती काळानुसार बदलत गेली.

एआयचा वापर वाढत असला, तरी मानवी कौशल्य आणि सर्जनशीलतेचे महत्त्व कायम राहणार आहे,ह्व असे ते म्हणाले. मुंबई ही देशाची चित्रपट राजधानी म्हणून अधिक सक्षम व्हावी, यासाठी चित्रपट क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मिती वाढवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

दूरध्वनी क्र. : 020-24266011
GSTI No.: 27AAALI0006N3Z8

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**

E mail ID : eemd123@gmail.com

**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र. २, स्वारगेट, पुणे, ४११०३७**

जा. क्र. यां. वि. क्र.२, पुणे ३७/ई-नि.सु/लेखा - ५/११७७/सन २०२६ दि. ०६/०५/२०२६

**महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग**
**शुध्दीपत्रक**

कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग सोलापुर कार्यालयाची ई निविदा सुचना क्र. २०-०३ (Second Call) सन २०२५-२६ वर्तमान पत्रात प्रसिद्ध झालली आहे. तथापि ऑनलाईन तांत्रिक कारणास्तव सदर ई निविदा दि. ३०/०४/ २०२६ ऐवजी दि. ०८/०५/२०२६ रोजी पुढील कालावधीप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

| ई- निविदा वेळापत्रक | | |
|---|---|---|
| १ | ई निविदा दस्तऐवज डाऊनलोड प्रारंभ | दि- ०८/०५/२०२६ दुपारी ११.०० पासुन |
| २ | ई निविदा दस्तऐवज डाऊनलोड समाप्त | दि- १६/०५/२०२६ दुपारी १८.०० वाजेपर्यंत |
| ३ | ई निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दि- ०८/०५/२०२६ दुपारी ११.०० पासुन |
| ४ | ई निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि- १६/०५/२०२६ दुपारी १८.०० वाजेपर्यंत |
| ५ | निविदा तांत्रिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग सोलापुर -४१३००३ यांचे कार्यालयात दि -२०/०५/ २०२६ रोजी सकाळी ११.०० नंतर ऑनलाईल उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

इतर मजकुरात काहीही बदल नाही.
सदर बाबत शंका समाधानाकरीता निम्न नमुद केल्यानुसार संपर्क करण्यात यावा.
१) एनआयसी २४७ मदत कक्ष दुरध्वनी क्र. - १८०० ३०७० २२३२, भ्रमणध्वनी क्र. - ०७८७८१०७९८५/८६
२) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापुर दुरध्वनी क्रं. 0217-2990714

सही
**कार्यकारी अभियंता**
यांत्रिकी विभाग क्र.२, पुणे-३७

# विठ्ठल साखर कारखान्याला कृषी महाविद्यालयास मंजुरी, ६० विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वेणुनगर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला कृषी महाविद्यालय मंजूर झाले आहे. कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्त्वावर हे नवीन कृषी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने नमूद केल्यानुसार नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने विहित केलेल्या सर्व मानकांची आणि पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेची पूर्तता करत असल्याचे हमीपत्र या महाविद्यालयाने शासनाला सादर करावे लागणार आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत मंजूर झालेल्या या महाविद्यालयात ६० विद्यार्थी प्रतिवर्ष प्रवेश क्षमता असणार आहे. जिल्ह्यात सध्या वडाळा (ता. उत्तर सोलापूर), अकलूज व पानीव (ता. माळशिरस) या ठिकाणी कृषी महाविद्यालये कार्यरत आहेत. त्यानंतर हे चौथे महाविद्यालय असणार आहे. या महाविद्यालयात व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या प्रवेश नियमानुसार प्रवेश प्रक्रिया होणार आहे. विद्यापीठ तपासणी समितीच्या अहवालातील निष्कर्षात नमूद बाबींची त्रुटींची पूर्तता विहित कालावधीत करावी लागणार आहे. या बाबींची पूर्तता केल्यानंतर महाविद्यालयास प्रवेश प्रक्रिया राबविण्यास अनुमती देण्यात येणार आहे.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नभ, गगन २) पाहुणे ३) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा ४) लहान बाळाला ही टोचतात ५) भारतात सर्वाधिक साक्षरता असलेले राज्य ६) एअरफोर्स (मराठीत) ७) त्वरेने, पटकन १२) न्यूझिलंडचा एक फलंदाज १४) सेनापती १५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना १६) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत १७) खलनायक (इंग्रजीत) २१) देवाला घातलेले साकडे २२) नाहक त्रास करून घेणे २३) २६/११ च्या हल्ल्यातील दहशतवादी २४) महाराष्ट्राचे काँग्रेस आघाडी सरकारचे एक माजी मुख्यमंत्री २६) कृषी विद्यापीठ असलेले कोकणातील ठिकाण ३१) पाच दुणे ३४) लाकूड कापण्याचे साधन ३५) फळ (हिंदीत) ३६) समुद्राच्या पाण्यात असणारा एक प्राणीजीव ३७) एक म्हण- गाव करील ते ** काय करील ३८) चव ओळखणारी जिव्हा ४०) यशाचे गुपित, सूत्र ४१) परिवर्तन ४४) फळातील गोड द्रव ४५) चार आणि तीन मिळून होणारी संख्या ४७) सज्जन, प्रामाणिक

**आडवे शब्द :** १) भारतातील टी-२० क्रिकेट स्पर्धेचे नाव ५) दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे आडनाव ८) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच ९) सत्वयुक्त, कस असलेले १०) तरूण ११) एक जुने हिंदी गीत- ** है सुहाना, वातावरण (हिंदीत) १२) पाण्यात विहरणारा एक पांढऱ्या रंगाचा पक्षी १३) एखाद्या गोष्टीचे लागलेली वाईट सवय १६) महायुध्दाच्या काळातील जर्मनीचा हुकूमशहा १८) अश्व जोडलेले क्षत्रियाचे वाहन १९) किंमती वस्तू २०) चहा (इंग्रजीत) २१) आश्चर्य २३) रंग (इंग्रजीत) २५) वतनाचा मालक २७) दुधावरील मलई २८) आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्यातील एक युवा भारतीय फलंदाज-** शॉ २९) वस उलट लिहा ३०) देव, ईश्वर (हिंदीत) ३२) सीतापती ३३) त्रास (हिंदीत) ३६) राजाला दिली जाणारी उपाधी ३९) घाई, गडबड ४२) आश्वासन, दिलेला शब्द ४३) विश्वास ४६) मुस्लिम धर्माची शिक्षण देणारी शाळा ४८) नेहमी ४९) उद्या (हिंदीत) ५०) तिखट न टाकलेले डाळीचे कालवण

## सुडोकु - 244

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 9 | | 6 | | | 3 | 8 |
| | | 4 | 5 | | 8 | 1 | | |
| 6 | | 5 | | | | 4 | | 9 |
| | 5 | | 3 | 4 | | | 2 | |
| | | | | | 1 | | | |
| 4 | 7 | | | | 6 | 8 | 9 | 1 |
| | | | 4 | 2 | | 9 | 1 | 3 |
| | 4 | 2 | 9 | 1 | | 6 | | |
| | 9 | 7 | | | | 2 | | 4 |

# दावल मलिक बाबा दर्ग्याजवळील ३० हून अधिक अतिक्रमणे जमीनदोस्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी परिसर बुधवारी दिवसभर तणावपूर्ण वातावरणाने ढवळून निघाला. दावल मलिक बाबा पीर दर्ग्याजवळील वनजमिनीवर उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांवर वन विभागाने मोठी कारवाई करत बुलडोझर फिरवला. अनेक वर्षांपासून उभ्या असलेल्या दुकानांपासून पत्र्याच्या शेड, टपऱ्या, पाण्याच्या टाक्या आणि पक्क्या बांधकामांपर्यंत सर्वच अनधिकृत रचना जमीनदोस्त करण्यात आल्या.

मोठ्या पोलिस बंदोबस्तात पार पडलेल्या या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. प्रशासनाच्या या धडक मोहिमेमुळे अतिक्रमणधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनजमिनीवरील अवैध बांधकामांबाबत प्रशासन आता कठोर भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

ही कारवाई केवळ औपचारिक नव्हती, तर पूर्ण नियोजनबद्ध आणि मोठ्या यंत्रणेसह राबवण्यात आली. तब्बल ५ जेसीबी, १० टेम्पो, ट्रॅक्टर, पोलिस व्हॅन आणि वन विभागाच्या वाहनांचा मोठा ताफा सकाळपासूनच बोरामणीत दाखल झाला होता. जवळपास ९० ते १०० अधिकारी आणि कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते.

परिस्थिती नियंत्रणात राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी संपूर्ण परिसराला सुरक्षा कवच दिले होते.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत २० ते २५ दुकाने तसेच एकूण ३० ते ४० अतिक्रमणे हटवण्यात आली. अनेकांनी वनजमिनीवर वर्षानुवर्षे व्यवसाय थाटून कायमस्वरूपी बांधकामे उभी केली होती. मात्र वन विभागाच्या नोंदीनुसार त्या




ठिकाणी केवळ मूळ दर्गा, रस्ता आणि पाण्याची विहीर यांनाच अधिकृत मान्यता असल्याचे स्पष्ट झाले.

उर्वरित सर्व बांधकामे अनधिकृत असल्याने ती हटवण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार बुधवारी प्रत्यक्ष बुलडोझर कारवाई करण्यात आली.

बोरामणी परिसरातील वनजमिनीवरील अतिक्रमणांचा मुद्दा राज्याच्या हिवाळी अधिवेशनातही गाजला होता. या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधितांवर कारवाई करून अतिक्रमणे हटवण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या होत्या.

यानंतर वन विभागाने संबंधितांना वारंवार नोटिसा बजावून स्वतःची बाजू मांडण्याची संधी दिली होती. मात्र समाधानकारक कागदपत्रे सादर करण्यात अतिक्रमणधारक अपयशी ठरल्याने अखेर कठोर कारवाईचा निर्णय घेण्यात आला.

दावल मलिक दर्गा ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव मन्सावाले आणि सचिव लिजाम मुजावर यांनी २ जानेवारी रोजी सहायक वनसंरक्षक यांच्यासमोर उपस्थित राहून आपली बाजू मांडली होती.

तथापि, संबंधित बांधकामे कायदेशीर असल्याचे सिद्ध करणारी ठोस कागदपत्रे सादर करण्यात त्यांना अपयश आले.

त्यामुळे वन विभागाने अतिक्रमणे निष्कासित करण्याचे आदेश जारी करत प्रत्यक्ष कारवाईचा मार्ग मोकळा केला.

या प्रकरणात वनरक्षक गंगाधर कणवस यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २६ अंतर्गत वन गुन्हा नोंदवला होता. त्यानंतर जवळपास १५ जणांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या.

कारवाईदरम्यान पुण्याचे वनसंरक्षक अशिष ठाकरे, सोलापूरचे उपवनसंरक्षक कुलराज सिंह, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहायक वनसंरक्षक अजित शिंदे आणि ऐश्वर्या शिंदे, पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्यासह वन विभाग आणि पोलिस दलातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तसेच आर. ए. गांगार्डे, आर. एस. आटोळे, योगेश घोडके, एस. व्ही. मगर, एस. बी. चाटे, ए. एन. करे यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी–कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते.

या कारवाईनंतर प्रशासनाने स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, वनजमिनीवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाहीत.

सरकारी जमिनींवर बेकायदेशीर बांधकामे करून कायद्याला आव्हान देणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर मोहिमा राबवल्या जातील, असा संदेश या धडक कारवाईतून देण्यात आला आहे.

# जीपची काच फोडून १ लाखांची बॅग लंपास; चोरटे सीसीटीव्हीत कैद

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):** टेंभुर्णी शहरात भरदिवसा भरचौकात घडलेल्या धाडसी चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अकलूज चौक परिसरातील हॉटेलसमोर उभी असलेल्या बोलेरो गाडीची काच फोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल १ लाख रुपयांची रोकड असलेली बॅग चोरून नेली. विशेष म्हणजे ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नागनाथ अरुण मेनकुदळे (रा. वरवडे, ता. माढा, जि. सोलापूर) हे मंगळवार दि. ५ रोजी दुपारी बँक ऑफ बडोदा शाखेतून १ लाख रुपये काढून आपल्या बोलेरो गाडी (एमएच १३ सीएस ७२५५) मधून निघाले होते. दुपारी सुमारे १.१५ वाजण्याच्या दरम्यान त्यांनी अकलूज चौकातील हॉटेल जय शिवशंकर समोर गाडी उभी केली. गाडीच्या मधल्या सीटवर रोकड भरलेली काळी बॅग ठेवून गाडी लॉक करून ते मित्र अशोक बाबूराव मस्के (रा. शेवरे, ता. माढा) व शांतीलाल लक्ष्मण खुळे (रा. टेंभुर्णी) यांच्यासोबत हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी गेले.

दरम्यान, संधी साधत दुचाकीवरून पाळत ठेवून आलेल्या दोन चोरट्यांनी अवघ्या काही मिनिटांत आपला डाव साधला. गाडीभोवती कोणी नसल्याची खात्री करून एका चोरट्याने धारदार वस्तूच्या सहाय्याने बोलेरोची काच फोडली आणि सीटवर ठेवलेली रोकड असलेली बॅग क्षणार्धात लंपास केली. त्यानंतर दोघेही दुचाकीवरून वेगाने पसार झाले.

दुपारी सुमारे २.३० वाजता नागनाथ मेनकुदळे गाडीजवळ परत आले असता गाडीची काच फुटलेली व पैशांची बॅग गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यानंतर त्यांनी तत्काळ टेंभुर्णी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

या धाडसी चोरीची संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली आहे. फुटेजमध्ये दोन संशयित दुचाकीवरून गाडीच्या मागोमाग येताना, परिसराची पाहणी करताना आणि काच फोडून बॅग घेऊन पसार होताना दिसत आहेत. या फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून आरोपींचा शोध सुरू आहे.

भरदिवसा मुख्य चौकात घडलेल्या या प्रकारामुळे व्यापारी व नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. शहरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून पोलिसांनी गस्त वाढवून अशा टोळ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ शिवाजी जाधव करीत आहेत.

# सफाई कर्मचाऱ्यांसाठी मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करणे आवश्यक – डागोर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :–** सफाई कर्मचाऱ्यांच्या समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरिता केंद्र व राज्यशासन मिळून काम करीत आहेत; त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातही सफाई कर्मचाऱ्यांच्या पुर्नवसनाकरिता मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करावे , या मॉडेलची अंमलबजावणी राज्यात करण्यात येईल, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.




जिल्हा नियोजन भवन येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारण करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कुशाल जैन,सहायक आयुक्त समाज कल्याण श्रीमती सुलोचना सोनवणे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी तसेच विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता घरकुल, आरोग्य, शिक्षण, रोजगार आदी विषयांशी निगडित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. लाड – पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने भरावयांच्या पदांबाबतची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नगर विकास विभागाचे 22 ऑक्टोबर 2008 रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना लागू करण्यात आली असल्याने या आदेशाच्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार आणि 22 ऑक्टोबर 2008 नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले आहेत अशा मृत सफाई कामगारांच्या पात्र वारसांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावी.

केंद्र व राज्यशासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता शिबीरांचे आयोजन करावे. शिबीरे आयोजित करतांना सफाई कामगार क्षेत्रात कार्यरत अधिकृत संघटनांसोबत सोबत घ्यावे. विविध लोककल्याणकारी योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवांचा लाभ कॅशलेस सुविधांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. सफाई कर्मचाऱ्यांशी निगडित प्रलंबित मार्गी लावून तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा, अशा सूचना श्री. डागोर यांनी दिल्या.

सफाई कर्मचारी आयोगाने दिलेल्या निदेर्शाप्रमाणे जिल्ह्यात काम करण्यात येईल. यापूर्वीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निदेर्शाप्रमाणे सर्व संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल लवकरात लवकर आयोगाकडे सादर करावा, असेही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बैठकीस उपस्थित विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

# अकलूज येथे ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने ११ बटुंवर उपनयन संस्कार

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** अकलूज येथील ब्राह्मण सेवा संघ व श्री गणपती मंदिर ट्रस्ट यांचे वतीने आयोजित सामुदायिक व्रतबंध सोहळ्यामध्ये ११ बटुंवर उपनयन संस्कार करण्यात आले. अकलूज येथील कांतीलाल सांस्कृतिक भवन येथे हा शाही समारंभ पार पडला.उपनयन हा हिंदू संस्कृतीमधील सोळा संस्कारापैकी एक महत्वाचा संस्कार असून ज्ञानार्जनासाठी बटूला सज्ज करणारा संस्कार म्हणून त्याचे एक वेगळे महत्त्व आहे. समाजातील गरजूंना अल्प खर्चात हा संस्कार करता यावा यासाठी ट्रस्टच्या वतीने दरवर्षी सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.



या कार्यक्रमात बटुंना शुभाशीर्वाद देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंहजी मोहितेपाटील, जयसिंह मोहितेपाटील, किशोरसिंह माने पाटील, सौ.शीतलदेवी मोहितेपाटील, शिवतेजसिंह मोहितेपाटील, धनंजयभाऊ देशमुख, अभय इनामदार व अकलूजमधील नगरसेवक व मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्याचे पौरोहित्य दिपक शास्त्री कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हरिकाका कुलकर्णी, अवधूत शेकदार,प्रवीण इनामदार, श्रीराम महाजन,गणेश कुलकर्णी, निलेश कुलकर्णी यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्राह्मण सेवा संघ व श्री गणपती मंदिर ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी व समाज बधू व भगिनींनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून स्व गणना पूर्ण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** :– सोलापूर जिल्हा संपूर्ण भारतात 1 मे 2026 पासून स्व गणना करण्यास सुरुवात झालेली आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतःची डिजिटल गणना यशस्वीरित्या पूर्ण केली. व जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी 15 मे 2026 पर्यंत दिलेल्या https://se.census.gov.in या संकेतस्थळावर स्वतःची माहिती भरून स्व जनगणनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

सोलापूर जिल्ह्यात डिजिटल जनगणना 2027 अंतर्गत स्वयं गणनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, जिल्ह्यातील पूर्णतेचे प्रमाण तब्बल 79.82 टक्के इतके झाले आहे. 7 मे 2026 रोजी च्या अहवालानुसार, सोलापूरमध्ये एकूण 20,165 स्वयं गणना प्रक्रिया सुरू करण्यात आल्या असून त्यापैकी 16096 गणना यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत. जिल्ह्यातील नागरिक डिजिटल माध्यमातून स्वतःची माहिती नोंदवून शासनाच्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद देत आहेत.

# राष्ट्र हिताचं काम डिजिटल मीडियाच्या योगदानाने पूर्ण होईल– गोवा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत

**पणजी (कटूसत्य वृत्त):–** देशाला 'विकसित भारत' बनवण्याचे स्वप्न केवळ सरकारी योजनांनी नव्हे, तर सत्याची साथ देणाऱ्या डिजिटल मीडियाच्या योगदानाने पूर्ण होईल. माहितीच्या महापुरात वाहून न जाता डिजिटल मीडियाने नितिमत्ता आणि कर्तव्यभावनेची सांगड घालून राष्ट्र उभारणीत सक्रिय सहभागी व्हावे, असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्यावतीने पणजी येथील कला अकादमीत आयोजित तिसऱ्या 'राष्ट्रीय महाअधिवेशनाचे' उद्घाटन डॉ. सावंत यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ सावंत म्हणाले की, बातमी केवळ व्हायरल करण्यासाठी न देता त्यामागे सखोल संशोधन असावे. तुमची बातमी इतिहासाला साक्षी ठेवून भविष्याचा वेध घेणारी असायला हवी. तसेच, डिजिटल मीडिया संपादकांच्या विविध मागण्यांचे पत्र आपण स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत पोहोचवू, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.



या अधिवेशनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६' देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने निलेश सांबरे (ग्रामसेवा), डॉ. महुवा साहा (शास्त्रज्ञ), कमलाकांत तारी (गोवंश संवर्धन), गुरुप्रसाद पावसकर (आयुक्त, दिव्यांग संचालनालय), विकास देशमुख (आरोग्य सेवा), चित्रा क्षीरसागर (साहित्यिक), ग्रामविकास संस्था नागझरी, सातारा (जलसंधारण – संस्थात्मक पुरस्कार) यांसह कमलेश बांदेकर, दीपक नार्वेकर, नेहा आंग्रे गांवस, प्रकाश कुलकर्णी, माणिक शेडगे, प्रा. विशाल गरड, राधा खताळ, गोवर्धन दराडे, संतोष ठोंबरे, पोश गुप्ता, राजेंद्र अग्रवाल, आणि राजेंद्र पाठक यांनाही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात आयोजित परिसंवादात'पत्रकारितेचे बदलते टप्पे आणि आव्हाने' या विषयावर 'कोकणसाद' चे संपादक संचालक संजय ना. ढवळीकर यांनी मार्गदर्शन केले. याशिवाय ॲड. संदीप कायदे, ॲड. नकुल पार्सेकर, सौमित्र देसाई यांनी विविध विषयांवर आपली मते मांडली.

यानंतर महाराष्ट्राचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी प्रकट मुलाखत घेतली.

या सोहळ्याला समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई, आयुष्मान भारत योजनेचे डॉ. ओमप्रकाश शेटे, खासदार सदानंद तानावडे, संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, गोवा प्रदेशाध्यक्ष अनिल पाटील, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत, रामकृष्ण वेताळ, राज्य उपाध्यक्ष सागर चव्हाण यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक विकास भोसले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी तर आभार सागर चव्हाण यांनी मानले.

**सोलापुरातील पदाधिकारी आणि सदस्यांचा सहभाग**

सोलापुरातून अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटक तथा स्मार्ट सोलापूरकर डिजिटल मीडियाचे संपादक परशुराम कोकणे, सोलापूर शहराध्यक्ष विकास कस्तुरे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रशांत कटारे, जिल्हा समन्वयक राजाराम मस्के, सोलापूर शहर कार्याध्यक्ष सचिन जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी आणि सदस्य अधिवेशनात सहभागी झाले होते.

# भरधाव कारची उभ्या ट्रकला धडक; तिघा मित्रांचा करुण अंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहरातील पुणे नाका ते मार्केट यार्ड मार्गावर (हैदराबाद रोड) काल बुधवारी मध्यरात्री 1 वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. तीन जीवलग मित्रांचा अपघातात मृत्यू झाला आहे.

दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सोलापूर–हैदराबाद मार्गावर हा अपघात झाला आहे.

**नेमका कसा झाला अपघात?**

डी–मार्टपासून सुमारे 500 मीटर अंतरावर मार्केट यार्डच्या दिशेने निघालेल्या एका भरधाव इरटीगा कारने एमएच 13 इके 7209 रस्त्यावर थांबलेल्या ट्रकला एमएच 13 सीयू 8699 पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यात कारमधील दोन मित्रांचा जागीच मृत्यू झाला आहे. 1 जण गंभीर जखमी झाला होता. आज गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान तिसऱ्या मित्राचा मृत्यू झाला आहे. शेखर सुरेकर (वय 33, रा. कुमठा नाका, सोलापूर) आणि अमोल धैर्यशील येरटे (वय 40, रा. दाळगे प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर) यांचा जागीच मृत्यू झाला. कादर सैदू हांडे (वय 33, रा. कुमठा नाका, सोलापूर) तरुण गंभीर जखमी झाला होता. आज गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान कादर हांडेचा मृत्यू झाला आहे. स्वरुप कोथींबीरे (वय 27, जुनी मिल चाळ, सोलापूर) आणि अमित राजेश जाधव (वय 30, रा. पांडुरंग वस्ती, शास्त्री नगर, सोलापूर) हे दोघे किरकोळ जखमी झाले आहेत.

**जेवणासाठी पाच मित्र ढाब्यावर गेले होते**

सोलापूर– हैदराबाद महामार्गावर झालेला अपघात इतका भीषण होता की, कार सुमारे दीडशे फूट फरफटत गेली. कारचे संपूर्ण छत कापून बाजूला निघून पडले आहे. कारमधील पाच मित्र पुणे रोडवरील ढाब्यावर जेवणासाठी गेले होते. जेवण आटोपून ते मध्यरात्री परत निघाले होते. डी–मार्टच्या पुढे पर्ल गार्डनच्या समोर हायवेवर ट्रक उभा होता. वळणावर कारचालकाला तो दिसला नाही. त्यामुळे ही कार ट्रकवर पाठीमागून धडकली.

**दोघांचा रात्री मृत्यू तर सकाळी एक मृत्यू**

अपघाताची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. शेखर सुरेकर आणि अमोल येरटे या दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. कादर हांडे, स्वरूप कोथिंबीरे, अमित जाधव असे तिघे जखमी झाले होते. मृतांचे शवशवविच्छेदनसाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते तर जखमी वर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान कादर हांडेचा मृत्यू झाला आहे. शासकीय रुग्णालयात मृतांच्या नातेवाईकांची मोठी गर्दी झाली आहे.

# सफाई कर्मचारी आयोगाच्या अध्यक्षांच्या उपस्थितीत महापालिकेत आढावा बैठक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग, मुंबईचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त मा. श्री. शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांच्या सोलापूर दौऱ्यानिमित्त आज सोलापूर महानगरपालिका येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत लाड–पागे समितीच्या शिफारशीप्रमाणे प्रलंबित प्रकरणे, त्यावर करण्यात आलेली कार्यवाही तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व त्यांचे निराकरण याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान मा. अध्यक्ष श्री. डागोर यांच्यासोबत झालेल्या बैठकीतही सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या मांडल्या. कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, निवारा व त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेतील बैठकीत बोलताना मा. श्री. डागोर यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय तसेच संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. 'सोलापूर शहराची स्वच्छता राखण्यासाठी दिवस–रात्र परिश्रम घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची जबाबदारी प्रशासनाने प्राधान्याने घ्यावी, ' असे त्यांनी नमूद केले.

अलीकडील काळात सफाई कर्मचाऱ्यांमध्ये वाढत्या आरोग्य समस्यांकडे लक्ष वेधताना त्यांनी विशेषतः महिला कर्मचाऱ्यांमध्ये ब्रेस्ट कॅन्सर, दम्याचा त्रास व इतर गंभीर आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आणून दिले. या पार्श्वभूमीवर महापालिकेअंतर्गत कार्यरत सर्व सफाई कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या संपूर्ण कुटुंबासह पाच लाख रुपयांपर्यंतचा कॅशलेस आरोग्य विमा लागू करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

तसेच कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध सोयी–सुविधांचा योग्य लाभ मिळावा, यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलींना सायकली उपलब्ध करून देणे, मुलांना विविध कौशल्य प्रशिक्षण देऊन सक्षम बनवणे, अशा सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांवरही भर देण्यात आला.

यावेळी महापालिकेच्या वतीने लाड–पागे समितीअंतर्गत ३७ जागांचे वाटप करण्यात आले. शासनाच्या २०२३ च्या सुधारित शासन निर्णयानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नियुक्त्या देण्यात आल्या. यामध्ये १३ पदे कनिष्ठ श्रेणी लिपिक, २ पदे कनिष्ठ अभियंता तसेच उर्वरित पदे सफाई कामगार म्हणून देण्यात आली.

मा. अध्यक्ष श्री. शेरसिंग डागोर यांच्या हस्ते संबंधित उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. या प्रक्रियेबद्दल त्यांनी महापालिकेचे कौतुक केले. तसेच लाड–पागे समितीअंतर्गत प्रलंबित अर्ज लवकरात लवकर निकाली काढावेत आणि जुन्या प्रलंबित अर्जांची प्रतीक्षा यादी व नवीन अर्जांची प्रतीक्षा यादी स्वतंत्र ठेवावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त सोनाली यादव, मुख्यलेखा अधिकारी रत्नराज जवळगेकर, मुख्यलेखा परीक्षक सदानंद वाघमारे, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, सहायक आयुक्त गिरीष पंडित, सहायक आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका अक्कूलवार, कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, कामगार नेते बाली मंडेपू, श्रीनिवास रामगल यांच्यासह सर्व विभागीय अधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# जनतेच्या रोषानंतर हुलजंती तपासणी नाका बंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मंगळवेढ्यातून दक्षिण भारतात जाणाऱ्या मार्गावर हुलजंती हद्दीमधील वाहनाधारकाना लुटणारा तपासणी नाका अखेर बंद करण्यात आला. त्यामुळे हा तपासणी नाका नियमबाह्य पद्धतीने सुरू असल्याची शंका यामुळे वाहनधारकासह नागरिकांच्या मनात निर्माण झाली मात्र ही बंद ची अंमलबजावणी नेमकी किती दिवसासाठी याची विचारणा होत आहे.

सध्या मंगळवेढ्यातील दक्षिण भारतात जाणारी अवजड वाहने कर्नाटक सीमेवरील महाराष्ट्र सीमेवरील कात्राळ तपासणी नाक्यावर कॅमेरे बसविल्याने ओव्हरलोड वाहनाला दंड आकारण्यात येत असल्याने हा दंड वाचवण्यासाठी अनेक वाहनधारकानी पयार्यी मार्ग म्हणून हुलजंती उमदी या मार्गावरून विजापूरहून पुढे कर्नाटक केरळ तामिळनाडू या राज्यात जाण्याचा पर्याय निवडल्याने दुपदरी मार्गावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे अपघात वाढू लागली. हुलजंती परिसरातील चेक पोस्ट जवळ दोन दिवसांपूर्वी या भागातील तरुणाच्या अपघाती मृत्यूमुळे या परिसरामधील नागरिक संतप्त झाले.

कायमस्वरूपी ठाण मांडलेले अशोक पोस्ट जवळ कोणत्याही सुविधा नव्हत्या बॅरिगेट लावून वाहनधारकाकडून पैसे गोळा करणे याकडे इथल्या कर्मचाऱ्यांचे लक्ष होते जनतेच्या उद्रेकानंतर झालेल्या रस्ता रोको आंदोलनातील एका जागरूक नागरिकांनी इथले अधिकारी वाहने अडवून त्यांना लुटण्याचा प्रयत्न करतात मात्र इतर लगतच्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत कोणतेही काळजी घेत नाहीत एखादा अपघात झाला तर मदत देण्याची भूमिका देखील लवकर घेत नसल्याचा आरोप केला तर काहीनी या तपासणी नाक्याला अधिकृत शासन परवानगी आहे का याची विचारणा पोलीसासमोर केली.

यावेळी उपस्थित नागरिकांनी वाहने रस्त्यापासून दूर उभी करण्यात यावेत.रस्त्यालगत गतीरोधक बसविण्यात यावे.वाहतूक कोंडी करू नये. सदर बाबीची पूर्तता जोपर्यंत होत नाही तोपर्यंत चेक पोस्ट बंद करण्यात यावा किंवा अन्यत्र हलवण्यात यावा अशा मागणीचे निवेदन दिल्यानंतर चेक पोस्ट वरील कर्मचाऱ्यांनी परिवहन अधिकाऱ्यांना पत्र पाठवून मार्गदर्शन मागवले.

परंतु अपघातानंतर दोन दिवस हा चेक पोस्ट बंद होता आणि रात्री केलेल्या रस्ता रोको आंदोलन नंतर आज दिवसभर हा चेक पोस्ट बंद करण्यात आला रस्त्याच्या वाहनाई अडवण्यासाठी लावण्यात आलेले बॅरिगेट हे रस्त्यावरून बाजूला केले त्यामुळे जनतेच्या रोशामुळे बंद करण्यात आला असला तरी या घटनेवर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी काय निर्णय घेतात किंवा वाहनाची लूट जनतेचा रोष शांत झाल्यानंतर पुढे कायम ठेवतात याकडे लक्ष लागले.